https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

दैनिक
# समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG

वैभव विवेक स्वामी
सपादक

राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.

बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी वर्ष - ६ वे अंक -२९८ मंगळवार दि.०७ जुलै २०२६ 98 22 62 85 21 आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रू । पाने ४

Beed Daily Marathi Year-6th Issue-298 Tuesday, Dt.07 July 2026 98 22 62 85 21 RNI - MAHMAR/2020/79801 Price 3 Rs. Pages 4

## परिवहन विभागात मोठे रॅकेट; वडेट्टीवारांचा आरोप

मुंबई : प्रतिनिधी

राज्याच्या प्रादेशिक परिवहन विभागात भ्रष्टाचाराचे आणि बेकायदेशीर वसुलीचे एक मोठे रॅकेट कार्यरत असून, जे इमानदार अधिकारी या वसुलीला साथ देत नाहीत, त्यांना जाणीवपूर्वक एसीबीच्या जाळ्यात अडकवले जाते, असा अत्यंत खळबळजनक आरोप काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांनी केला आहे.

मंगळवारी ७ जुलै रोजी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात बोलताना विजय वडेट्टीवार यांनी आरटीओ विभागातील संघटित वसुली रॅकेटचा पर्दाफाश केला.

नागपूर आरटीओमध्ये चोरीच्या वाहनांच्या नोंदणीसह मोठ्या गैरव्यवहारांचा आरोप त्यांनी केला. ते म्हणाले की, या रॅकेटमधील अधिका-यांना १५ वर्षांहून अधिक काळ केवळ विदर्भातच पोस्टिंग दिली जात आहे. यावेळी त्यांनी काही अधिका-यांची थेट नावे घेतली, ज्यामध्ये निवृत्त आरटीओ अधिकारी बजरंग खरमाटे, अकोल्याचे प्रादेशिक




परिवहन अधिकारी रवींद्र भुयार, अमरावतीचे निलंबित मोटार वाहन निरीक्षक राजू नागरे, गोंदियाचे आनंद मोहोड आणि खामगावचे निलंबित अधिकारी योगेश खेसनार यांचा समावेश आहे. हे सर्व अधिकारी मिळून बेकायदेशीर वसुली करतात, असा थेट आरोप त्यांनी केला.

या रॅकेटची भयानक कार्यपद्धती मांडताना वडेट्टीवार म्हणाले की, जे अधिकारी बेकायदेशीर वसुली करण्यास नकार देतात, त्यांना जाणीवपूर्वक टार्गेट केले जाते. ट्रान्सपोर्टरमार्फत खोटे तक्रारदार उभे केले जातात आणि नियोजनबद्ध पद्धतीने परिस्थिती निर्माण करून अशा अधिका-यांवर 'एसीबी'चा ट्रॅप लावला जातो. अशा अधिका-यांना अडकवून मानसिक त्रास दिला जात असल्याचा गंभीर आरोप त्यांनी केला. तसेच, महागड्या आयात केलेल्या वाहनांची नोंदणी महाराष्ट्राऐवजी इतर राज्यांत करून राज्याचा मोठा महसूल बुडवला जात असल्याचा मुद्दाही त्यांनी उपस्थित केला.

## मुंबई, पुण्यात हाहाकार

मुंबई : प्रतिनिधी

मागच्या ३ दिवसांपासून क्षणाचीही उसंत न घेता कोसळणा-या पावसाने मुंबई, ठाणे, पालघर, रायगड, कोकणसह राज्यातील काही जिल्ह्यांत हाहाकार उडाला. अतिवृष्टीमुळे अनेक ठिकाणी दरडी कोसळून महामार्ग ठप्प झाले. दरड कोसळल्याने पुणे-मुंबई महामार्गासह रेल्वेसेवा ठप्प झाली. नुकत्याच सुरू झालेल्या मिसिंग लिंकचेही मोठे नुकसान झाले. मुंबई-गोवा महामार्गावर २ ठिकाणी दरड कोसळली असून हजारो वाहने रस्त्यात अडकली. दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपत्ती स्थितीचा आढावा घेतला. ८ तारखेपर्यंत पावसाचा जोर कायम राहणार असून, अनेक जिल्ह्यात पुढील ४८ तासात अतिवृष्टीचा रेड अलर्ट देण्यात आला. अतिवृष्टीमुळे शाळा, महाविद्यालयांना सुटी देण्यात आली.जून महिन्यात पाऊस बेपत्ता होता. परंतु ३ जुलैला राज्यात सक्रिय झालेल्या मान्सूनने अर्ध्या महाराष्ट्रात प्रलयाची स्थिती निर्माण केली. शनिवारपासून मुंबई, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, कोल्हापूर, पुणे जिल्ह्यात पावसाने जोर धरला. सतत कोसळणा-या पावसाने या भागात, विशेषत: रायगड जिल्ह्यात हाहाकार उडाला. दरडी कोसळल्याने मुंबई-पुण्याला जोडणारे दोन्ही



### ४ दिवसांत महिन्याच्या सरासरीएवढा पाऊस

मुंबईत गेल्या चार दिवसांत महिन्याभराच्या सरासरीएवढा पाऊस पडला. पालघर, वसई-विरार, रायगड, सातारा, कोल्हापूर आदी परिसरातही मोठ्या प्रमाणात अतिवृष्टी झाली आहे. त्यामुळे मुंबईसह पुणे, कोकण, पश्चिम महाराष्ट्रात हाहाकार उडाला असून, जनजीवन विस्कळीत झाले आहे. वाहतूकदेखील ठप्प झाली आहे.

महामार्ग व रेल्वेसेवा ठप्प झाली. मिसिंग लिंक वरील पहिल्या बोगद्याजवळ दरड कोसळली. त्यामुळे हा मार्ग ठप्प झाला. कडा कोसळल्याने कशेडी जवळ बोगद्याचा स्लॅब कोसळला. खालापूर टोलनाक्याजवळ डोंगरावरून पाणी व माती आल्याने द्रुतगती महामार्गावरील वाहतूक बंद करावी लागली. तेथील फूड मॉलमध्ये मोठ्या प्रमाणात पाणी घुसले. मंकी हिल जवळ दरड कोसळली. त्यातच रुळाखालील भराव वाहून गेल्याने रेल्वेसेवा ठप्प झाली. मुंबई-पुण्यादरम्यानच्या ६ रेल्वेगाड्या रद्द करण्यात आल्या तर काही गाड्या अन्य मार्गाने वळवण्यात आल्या.

मुख्यमंत्र्यांनी संपूर्ण स्थितीचा आढावा घेतला असून, अभूतपूर्व संकटामुळे बिकट स्थिती निर्माण झाली आहे. या परिस्थितीला तोंड देण्यासाठी आपत्ती व्यवस्थापन विभाग २४ तास कार्यरत असून अगदी गावपातळीपर्यंत लक्ष देण्यात येत असल्याची माहिती त्यांनी दिली.

### मुंबईत ३ दिवसांत ३०० मि. मी. पाऊस

मुंबईत ३ दिवसांपासून अतिमुसळधार पाऊस कोसळत असून शहर विभागात ३०० मिलीमीटर, पूर्व उपनगरात ३८० मिलीमीटर तर पश्चिम उपनगरांत ३४५ मिलीमीटर पावसाची नोंद झाली. या विक्रमी पर्जन्यामुळे आणि ताशी ७० ते ८० किलोमीटर वेगाने वाहणा-या वादळी वा-यामुळे आपत्कालीन स्थिती ओढवली आहे. या परिस्थितीचा प्रभावीपणे सामना करण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेची संपूर्ण यंत्रणा युद्धपातळीवर कार्यरत असल्याचे सांगण्यात आले.

## लातूर तालुक्यात 'विशेष सखोल पुनरिक्षण' मोहीम सुरु,मतदारांनी सहकार्य करावे - आवाहन

लातूर (प्रतिनिधी)

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमांतर्गत मतदारयादी अद्ययावत करण्याची मोहीम लातूर जिल्ह्यात सुरू करण्यात आली आहे. या विशेष मोहिमेअंतर्गत सन २००२ च्या मतदार यादीशी सर्व मतदारांचे मॅपिंग म्हणजेच पडताळणी करणे बंधनकारक करण्यात आले आहे. ज्या मतदारांचे मॅपिंग होणार नाही, त्यांना पुढील काळात मतदार नोंदणी अधिकाऱ्यासमोर सुनावणीच्या प्रक्रियेला सामोरे जावे लागणार



आहे. ही संभाव्य प्रक्रिया टाळण्यासाठी मतदारांनी तातडीने आपले मतदार मॅपिंग करून घ्यावे, असे आवाहन लातूरच्या उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे-विरोळे आणि तहसीलदार सौदागर तांदळे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

या मोहिमेसाठी लातूर तालुक्यातील सर्व मतदार केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) व पर्यवेक्षक यांना मतदारांचे मॅपिंग करणे, अस्पष्ट फोटो गोळा करून ते अद्ययावत करणे आणि डीएसई नोंदींची पडताळणी करणे या कामांसाठी ०१ जुलै २०२६ ते १५ जुलै २०२६ या कालावधीत पूर्णवेळ कार्यमुक्त करण्यात आले आहे. हे अधिकारी या कालावधीत मतदारांच्या घरोघरी भेट देऊन माहिती संकलन, ईएफ वाटप व जमा करणे आणि डिजिटायझेशनचे काम ३० जून २०२६ ते २९ जुलै २०२६ या कालावधीत पूर्ण करणार आहेत. या मोहिमेच्या वेळापत्रकानुसार २० जून ते २९ जून २०२६ दरम्यान बीएलओंचे प्रशिक्षण व मतदारयादी छपाईचे काम पूर्ण झाले असून, घरोघरी जाऊन माहिती संकलन केल्यानंतर ०५ ऑगस्ट २०२६ रोजी प्रारूप मतदारयादी प्रसिद्ध केली



बीड: गेवराई पोलीस ठाण्याचे पोलीस हवालदार एल. डी. जायभाये यांची पोलीस खात्यांतर्गत सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक पदी पदोन्नती मिळाल्याबद्दल त्यांना स्टार लावताना पो.नि. किशोर पवार, स.पो.नि. अण्णासाहेब पवार समवेत स.पो.नि. अतुल कुमार, समाधान दौड, पोलीस उपनिरीक्षक राम खोत, आप्पासाहेब रोकडे आदी पोलीस कर्मचारी.




## खापरखेड्यात नियम धाब्यावर बसवून क्वालिटी वाईन शॉपचा मनमर्जी कारभार

खापरखेडा(प्रतिनिधी)

राष्ट्रीय महामार्गावरील रेल्वे चौकी मुख्य बाजारपेठ परिसरात सुरू असलेल्या क्वालिटी वाईन शॉप प्रबंधकाने शासनाचे सर्व नियम धाब्यावर बसवले आहेत राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या कथित आशिरवादाने या ठिकाणी बिनधास्तपणे देशी-विदेशी दारूची विक्री सुरू असल्याचा खळबळजनक प्रकार समोर आला आहे त्यामूळे मुख्य बाजारपेठेतून ये-जा करणाऱ्या शाळा-महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या मनावर विपरीत परिणाम होण्याची भीती नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

### शालेय विद्यार्थ्यांच्या मनावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता.!

खापरखेडा परिसरात अनेक शाळा महाविद्यालय कार्यरत आहेत. दररोज शेकडो लहान मुले, मुली आणि विद्यार्थी याच मुख्य बाजारपेठेतून ये-जा करतात.विशेष म्हणजे या वाईन शॉपच्या अगदी समोरच बसस्थानक आहे. दुकानातून देशी व विदेशी दारूचे होणारे थेट प्रदर्शन येणाऱ्या-जाणाऱ्या विद्यार्थ्यांच्या थेट नजरेस पडते. यामुळे शासनाच्या नियमांची सर्रास पायमल्ली होत असून देशाचं भवितव्य घडवणाऱ्या भावी पिढीवर वाईट संस्कार होत असल्याची तीव्र प्रतिक्रिया पालकांमधून उमटत आहे.

सूत्रांकडून दिलेल्या माहितीनुसार सदर क्वालिटी वाईन शॉप मध्ये विनापरवाना देशी-विदेशी दारूची विक्री केली जात आहे विक्रीच्या नोंदी (सेल) दाखवण्यासाठी बोगस परवानाधारकांचा वापर केला जात असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. या दुकानातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज आणि रेकॉर्डची सखोल तपासणी केल्यास मोठे सत्य बाहेर येण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

## सोमनाथ मंदिर राष्ट्रीय स्वाभिमानाचे प्रतीक - मंत्री ॲड. आशिष शेलार

**सोमनाथ स्वाभिमान पर्व अखंड श्रद्धेची १००० वर्षे' उपक्रमास प्रारंभ**

मुंबई (प्रतिनिधी)

सांस्कृतिक कार्य विभाग तथा सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने आयोजित 'सोमनाथ स्वाभिमान पर्व - अखंड श्रद्धेची १००० वर्षे' या विशेष सांस्कृतिक उपक्रमास मुंबई सेंट्रल रेल्वे स्थानक येथून रेल्वेमार्गे प्रारंभ झाला.

यावेळी सांस्कृतिक कार्य, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विकास मंत्री ड. आशिष शेलार यांनी सहभागी नागरिकांशी संवाद साधतांना ते म्हणाले, सोमनाथ मंदिर केवळ आस्थेच्या केंद्रासोबतच राष्ट्रीय स्वाभिमान,



सांस्कृतिक अस्मिता आणि भारतीय सभ्यतेच्या अखंड परंपरेचे प्रतीक आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून सोमनाथ मंदिराचा इतिहास, सांस्कृतिक वारसा आणि त्यामागील प्रेरणादायी परंपरा अधिक व्यापकपणे समाजापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

## मतदार पडताळणी प्रक्रियेत नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवावा-अनिलदादा जगताप

बीड (प्रतिनिधी)

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार सुरू असलेल्या विशेष मतदार पडताळणी मोहिमेत प्रत्येक नागरिकाने उत्स्फूर्त सहभाग नोंदवून आवश्यक कागदपत्रे व माहिती वेळेत सादर करावी, असे आवाहन शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी केले आहे.

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री तथा शिवसेना मुख्य नेते एकनाथ शिंदे आणि खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेनेचे पदाधिकारी व शिवसैनिक मतदार पडताळणी मोहिमेत सक्रियपणे सहभागी होत असून, नागरिकांपर्यंत ही प्रक्रिया सुलभपणे पोहोचविण्याचे

### शिवसैनिकांनी घरोघरी पोहोचून मतदार पडताळणी पूर्ण करून घ्यावी



काम करत आहेत. नागरिकांनीही ही केवळ शासकीय प्रक्रिया न समजता आपली लोकशाहीप्रती असलेली राष्ट्रीय जबाबदारी म्हणून सहकार्य करावे, असे आवाहन जगताप यांनी केले. येत्या काही दिवसांत तहसील कार्यालयात वारंवार फेऱ्या मारण्याची वेळ येऊ नये, यासाठी घरी येणाऱ्या बीएलओ अधिकाऱ्यांना आवश्यक कागदपत्रे व भरलेले फॉर्म वेळेत उपलब्ध करून द्यावेत, असेही त्यांनी सांगितले.

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777
6 x 6.5

संपादकीय....

# खाद्यसंस्कृतीचा जागतिक दस्तावेज

छायाचित्र म्हणजे केवळ दृश्य नोंद नाही; ती एक कथा असते, हे सिद्ध करणारी 'वर्ल्ड फूड फोटोग्राफी अ‍ॅवॉर्ड्स २०२६' ही स्पर्धा नुकतीच संपन्न झाली. या स्पर्धेत ५० हून अधिक देशांमधून तब्बल ९ हजार छायाचित्रांची नोंद झाली. त्यातून हेच जाणवले की, प्रत्येक ताटामागे एक कुटुंब, प्रत्येक पिकामागे शेतकऱ्याचा घाम आणि प्रत्येक जेवणामागे संस्कृतीचा वारसा दडलेला असतो.

मानवाच्या उत्क्रांतीचा इतिहास सांगायचा झाला, तर तो अन्नाशिवाय पूर्ण होऊच शकत नाही. भाकरीच्या शोधापासून ते पंचतारांकित खाद्यसंस्कृतीपर्यंतचा प्रवास हा केवळ चवीचा नसून संस्कृती, परंपरा, श्रम, नाती आणि मानवी अस्तित्वाचा इतिहास आहे. म्हणूनच एखाद्या समाजाची ओळख त्याच्या भाषेत, वेशभूषेत किंवा कलेइतकीच त्याच्या अन्नसंस्कृतीतही दडलेली असते.

याच मानवी अनुभवांचा आणि खाद्यसंस्कृतीचा विलक्षण पट उलगडणारी 'वर्ल्ड फूड फोटोग्राफी अ‍ॅवॉर्ड्स २०२६' ही स्पर्धा यंदाही जगभरातील रसिकांचे लक्ष वेधून घेणारी ठरली. सोव्हिएत काळातील ऐतिहासिक आरोग्य केंद्रातील शांत भोजनगृहापासून ते बांगलादेशातील गजबजलेल्या बाजारपेठेपर्यंत, शेतातील कष्टापासून ते घरगुती स्वयंपाकघरातील आत्मीयतेपर्यंत आणि रस्त्यावरील खाद्यसंस्कृतीपासून ते सण-उत्सवांतील सामूहिक जेवणापर्यंत-या स्पर्धेतील प्रत्येक छायाचित्र अन्नाच्या माध्यमातून मानवी जीवनाची वेगळी कहाणी सांगते.

'टेंडरस्टेमएँ बिमीएँ ब्रोकोलिनी'च्या प्रायोजकत्वाखाली आयोजित करण्यात आलेल्या २०२६ च्या स्पर्धेत ५० हून अधिक देशांमधून तब्बल ९ हजार छायाचित्रांची नोंद झाली. या छायाचित्रांमध्ये शेतातील पिकांची कापणी, मासेमारी, स्थानिक बाजारपेठा, कौटुंबिक स्वयंपाकघर, स्ट्रीट फूड, पारंपरिक सण-उत्सव आणि उपजीविकेसाठीचा संघर्ष यांचे अस्सल चित्रण करण्यात आले आहे. या स्पर्धेची खरी ताकद तिच्या विषय वैविध्यात आहे. येथे केवळ आकर्षक खाद्यपदार्थांचे छायाचित्रण नाही, तर अन्न माणसाच्या आयुष्याला, संस्कृतीला आणि समाजव्यवस्थेला कशा प्रकारे आकार देते, याचा दृश्यात्मक दस्तऐवज साकारला जातो. ए

का कॅमेऱ्याच्या क्लिकमधून जगभरातील लोक काय खातात, एवढेच नव्हे तर ते अन्न कुठून येते, कोणाच्या श्रमातून तयार होते आणि त्यांच्या दैनंदिन आयुष्याशी कसे जोडलेले आहे, याचाही प्रभावी वेध या छायाचित्रांमधून घेतला जातो. यंदाचा सर्वोच्च पुरस्कार ब्रिटनच्या छायाचित्रकार जो किर्नी यांच्या - थोरप एरींी ळप ेिंहश उरपींशशप ेष ेिंहश डींळशीं-शीर डरपरींेीळीा या छायाचित्राला मिळाला. या छायाचित्रात एका वृद्ध महिलेचा साधा जेवणाचा क्षण टिपण्यात आला आहे. कोणताही कृत्रिम देखावा नाही, भव्य मांडणी नाही; तरीही प्रकाश, रंग आणि त्या महिलेच्या शांत, सन्मानपूर्ण उपस्थितीमुळे हे छायाचित्र मानवी प्रतिष्ठेचा आणि साधेपणातील सौंदर्याचा प्रभावी दस्तावेज बनते. या स्पर्धेतील विजेती आणि अंतिम फेरीतील छायाचित्रे पाहिली, तर अन्न हे केवळ ताटापुरते मर्यादित राहत नाही. कुठे ग्वाटेमालातील रस्त्यावर अननस विकणारा विक्रेता दिसतो, तर कुठे न्यूयॉर्कमधील शहरी शेतीत लेमनग्रासची कापणी करणारे शेतकरी. कोलंबियातील बाजारपेठेतील गजबज, उझबेकिस्तानमधील तंदूरमधून बाहेर आलेल्या गरम भाकरीला स्पर्श करणारे बालपण किंवा घरगुती स्वयंपाकातील साधे क्षण - प्रत्येक छायाचित्र अन्नाच्या माध्यमातून समाज, श्रम आणि संस्कृतीचे वेगळे रूप उलगडते.

# नाबालिकांच्या हातात इलेक्ट्रिक वाहने देणाऱ्या पालकांवर कठोर कारवाई करा - डॉ. आमेर हुसेन

माजलगाव (प्रतिनिधी)

माजलगाव शहरात अल्पवयीन मुलांच्या हातात इलेक्ट्रिक दुचाकी व इतर वाहने देण्याचे प्रमाण चिंताजनकरित्या वाढत असून, यामुळे अपघाताचा धोका दिवसेंदिवस वाढत आहे. विशेषतः शाळा, महाविद्यालये आणि गर्दीच्या परिसरात नाबालिगांकडून भरधाव वेगाने वाहने चालवली जात असल्याने विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर सहारा हॉस्पिटल, माजलगाव येथील डॉ. आमेर हुसेन यांनी पालकांसह प्रशासनाला कठोर पावले उचलण्याचे आवाहन केले आहे.

डॉ.आमेर हुसेन यांनी प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, स्वस्त दरात उपलब्ध होणाऱ्या इलेक्ट्रिक वाहनांमुळे अनेक पालक स्वतःच्या अल्पवयीन मुलांना कोणतीही कायदेशीर पात्रता किंवा वाहन चालविण्याचे प्रशिक्षण नसताना वाहने वापरण्यास देत आहेत. हा प्रकार अत्यंत धोकादायक असून त्यामुळे केवळ त्या मुलांचाच नव्हे, तर इतर वाहनचालक, पादचारी, शाळकरी विद्यार्थी आणि ज्येष्ठ नागरिकांच्याही जीवाला धोका निर्माण होत आहे.विशेषतः शाळा सुरू होण्याच्या आणि सुटण्याच्या वेळेत अनेक नाबालिग विद्यार्थी वेगाने वाहने चालवताना दिसतात. अशा प्रकारामुळे कोणत्याही क्षणी मोठी दुर्घटना घडू शकते. त्यामुळे पालकांनी आपल्या जबाबदारीचे भान ठेवणे अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.डॉ. हुसेन यांनी माजलगावातील पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते आणि जागरूक नागरिकांनी या गंभीर विषयाची दखल घेऊन जनजागृती करावी, असे आवाहन केले आहे. तसेच माजलगाव पोलीस प्रशासनाने विशेष मोहीम राबवून नाबालिगांकडून वाहन चालविणाऱ्या प्रकरणांवर कठोर कारवाई करावी, संबंधित वाहने जप्त करावीत आणि अशा मुलांच्या पालकांवर मोटार वाहन कायद्यानुसार कठोर दंडात्मक कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

मुलांच्या हट्टापायी त्यांच्या हातात वाहन देणे म्हणजे त्यांच्या भवितव्याशी आणि इतरांच्या जीवाशी खेळण्यासारखे आहे.



अपघात झाल्यानंतर पश्चात्ताप करण्यापेक्षा तो होऊच नये यासाठी प्रत्येक पालकाने जबाबदारीने वागणे आवश्यक आहे, असेही डॉ. आमेर हुसेन यांनी स्पष्ट केले.

माजलगाव शहरात सुरक्षित वाहतूक व्यवस्था निर्माण करण्यासाठी पालक, पोलीस प्रशासन, पत्रकार, सामाजिक संस्था आणि नागरिक यांनी एकत्रितपणे पुढाकार घेण्याची वेळ आता आली असल्याचे मतही त्यांनी व्यक्त केले.




# सहकार सप्ताहानिमित्त माजलगाव कृषी उत्पन्न बाजार समिती आवारात वृक्षारोपण

माजलगाव (प्रतिनिधी)

सहकार सप्ताहानिमित्त माजलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीच्या फुले पिंपळगाव मुख्य बाजार आवारात वृक्षारोपण कार्यक्रम दि. ६ जुलै रोजी दु. १.०० वा. उत्साहात पार पडला. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत विविध प्रकारच्या वृक्षांची लागवड करण्यात आली. सहकार सप्ताह वर्ष २०२६ अंतर्गत माजलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीच्या वतीने मुख्य बाजार आवार फुले पिंपळगाव येथे वृक्षारोपण करतांना सभापती जयदत्त नरवडे, उपसभापती श्रीहरी मोरे,सन्मानीय संचालक अशोकराव डक, वीरेंद्र भैय्या सोळंके, उद्धवराव नाईकनवरे, दत्तात्रय डाके, मनोजजी जगताप, संजयजी कचरे, आसारामजी घायतिडक,आबाजी भोसले,नंदकिशोरजी सजगणे,अमोलराव जाधव, नितीनराव नाईकनवरे, भागवतराव शेजुळ, भगवानराव आगे, प्रभाकरराव होके, कदीर पठाण व सचिव हरिभाऊ सवणे , लेखापाल उद्धव फपाळ व सर्व अधिकारी,कर्मचारी बांधव उपस्थित होते. सहकार सप्ताहानिमित्त राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचे उपस्थितांनी स्वागत करत पर्यावरण संरक्षणासाठी प्रत्येकाने वृक्षारोपण करून त्यांची जोपासना करावी, असे आवाहन करण्यात आले.

# विद्यार्थ्यांच्या सुरक्षित व सुलभ शिक्षणप्रवासासाठी एसटी महामंडळ कटिबद्ध -परिवहन मंत्री प्रताप सरनाईक

मुंबई (प्रतिनिधी)

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाची 'लालपरी' ही केवळ प्रवासी वाहतुकीचे साधन नसून राज्यातील लाखो शालेय विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची, सुरक्षिततेची आणि उज्वल भविष्याची विश्वासू जीवनवाहिनी बनली आहे. दुर्गम व ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांपर्यंत शिक्षणाची संधी पोहोचविण्याचे सामाजिक दायित्व एसटी महामंडळ अनेक दशकांपासून प्रभावीपणे पार पाडत असल्याचे परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी सांगितले.

विद्यार्थ्यांच्या सुरक्षित प्रवासाला सर्वोच्च प्राधान्य देत शालेय वेळेत बसस्थानकांवर पर्यवेक्षकीय कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात येत असल्याचे मंत्री सरनाईक यांनी सांगितले. हे कर्मचारी विद्यार्थ्यांना सुरक्षितपणे बसमध्ये चढण्यास मदत करतात. तसेच, प्रवासादरम्यान कोणतीही अडचण उद्भवल्यास तातडीने मदत मिळावी यासाठी एसटी



महामंडळाने स्वतंत्र टोल-फ्री मदत केंद्र सुरू केले असून त्यामुळे पालक आणि विद्यार्थ्यांचा एसटीवरील विश्वास अधिक दृढ झाला आहे. राज्यात दररोज सुमारे ३० हजार १७७ शालेय फेऱ्यांद्वारे लाखो विद्यार्थ्यांना सुरक्षित व नियमित प्रवासाची सुविधा उपलब्ध करून दिली जात आहे. विद्यार्थ्यांच्या शिक्षणात आर्थिक अडथळा येऊ नये, यासाठी एसटी महामंडळ विविध सवलतींच्या योजना प्रभावीपणे राबवत आहे.

# भाऊसाहेब भवर यांच्या वाढदिवसानिमित्त रंगणार 'होम मिनिस्टर'चा थरार

पाटोदा (प्रतिनिधी)

सामाजिक व राजकीय क्षेत्रात सक्रिय असलेले आणि आ. सुरेश (आण्णा) धस यांचे समर्थक, अमळनेर जिल्हा परिषद गटाचे नेते भाऊसाहेब (आण्णा) भवर यांच्या वाढदिवसानिमित्त महिलांसाठी एका विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. उद्या, मंगळवार, दि. ७ जुलै २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता पिंपळवंडी येथील माऊली लॉन्स येथे 'होम मिनिस्टर खेळ पैठणीचा' हा भव्य कार्यक्रम होणार आहे.

प्रमुख पाहुण्यांची उपस्थिती

या कार्यक्रमाला सौ. प्राजक्ताताई सुरेश (आण्णा) धस यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. तसेच, सौ. शितलताई निलेश मोरे (सरपंच) या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विराजमान होणार आहेत.या कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणून अनेक मान्यवर महिला नेत्या उपस्थित राहणार आहेत, ज्यात:सौ. चंपावती काकी पानसंबळ (ज्येष्ठ नेत्या, भाजप) सौ. रूपालीताई किरण शिंदे पाटील (सभापती, कृषी उत्पन्न बाजार समिती, पाटोदा) सौ. दिपालीताई राजू जाधव (नगराध्यक्ष, नगरपंचायत पाटोदा) सौ. सविताताई महेंद्र गर्जे आकर्षक बक्षिसे आणि स्पर्धा 'होम मिनिस्टर खेळ पैठणीचा' या कार्यक्रमाने संपूर्ण परिसरात सध्या मोठी चर्चा रंगली आहे. कार्यक्रमामध्ये महिलांसाठी



विविध मनोरंजक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले असून, विजेत्या महिलांना आकर्षक बक्षिसे देऊन गौरवण्यात येणार आहे.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सौ. रेखा भाऊसाहेब भवर आणि सौ. शितलताई निलेश मोरे यांच्यासह 'भाऊसाहेब अण्णा भवर मित्र मंडळा'चे सर्व कार्यकर्ते परिश्रम घेत आहेत. या आगळ्यावेगळ्या कार्यक्रमाचा आनंद घेण्यासाठी आणि वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यासाठी परिसरातील सर्व महिलांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन संयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.



# वारकऱ्यांचे आरोग्य, सुरक्षितता हीच सर्वोच्च प्राथमिकता सार्वजनिक आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर

पंढरपूर (प्रतिनिधी)

आषाढी वारीसाठी पंढरपुरात दाखल होणाऱ्या लाखो वारकरी भाविकांच्या आरोग्यासंदर्भात आवश्यक त्या उपाययोजनांसाठी राज्याचे आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी रविवारी उपजिल्हा रुग्णालय, पंढरपूर येथे प्रत्यक्ष भेट देऊन आरोग्य व्यवस्थेची सखोल पाहणी केली.

वारीदरम्यान कोणत्याही भाविकाला उपचारासाठी प्रतीक्षा करावी लागू नये, प्रत्येक रुग्णाला वेळेत आणि गुणवत्तापूर्ण उपचार मिळावेत तसेच संपूर्ण आरोग्य यंत्रणा २४ तास सतर्क ठेवावी, अशा सूचना त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

# प्रणिता गंगाखेडकर यांनी बीडच्या प्रभारी गट शिक्षणाधिकारी पदाचा कार्यभार स्वीकारला

बीड (प्रतिनिधी)

बीड पंचायत समितीच्या प्रभारी गटशिकणाधिकारीपती जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी प्रणिता गंगाखेडकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितिन रहमान यांनी दिनांक ६ जुलै २०२५ रोजी सदर नियुक्तीचे आदेश निर्गमित केले.बीड पंचायत समितीच्या गटशिक्षणाधिकारी पदी सेवा जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी श्रीमती प्रणिता गंगाखेडकर यांची नियुक्ती झाल्याने त्यांनी सोमवारी आपल्या पदाचा



कार्यभार स्वीकारला.बीड पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी तथा प्रभारी शिक्षणाधिकारी भगवान सोनवणे यांची दि. ३० जून रोजी सेवानिवृत्ती झाल्याने सदर पद रिक्त झाले होते.

श्रीमती प्रणिता गंगाखेडकर यांनी शिक्षक म्हणून उल्लेखनीय काम केले त्यानंतर त्यांची ज्येष्ठ शिक्षणाविस्तार अधिकारी या पदावर नियुक्ती झाली गुणवत्ता वाढीसाठी केंद्रात आणि तालुकास्तरावर त्यांनी मोठे योगदान दिले आहेत. समग्र शिक्षा चे बीड पंचायत समितीचे गटसमन्वयक म्हणूनही त्यांनी मोठे योगदान दिले आहे. कार्यतत्पर, अभ्यासू आणि प्रामाणिक म्हणून त्या सुपरिचित आहेत.का रे भर स्वीकारल्यानंतर अनेक शिक्षक संघटना संस्था आणि व्यक्तिगत त्यांचा गौरव करण्यात आला.

# राज्यस्तरीय योगासन स्पर्धासाठी गुळज येथील संस्कार अण्णासाहेब पवार ची निवड

बीड (प्रतिनिधी)

दिनांक ५ जुलै २०२६ रोजी बीड येथे संपन्न झालेल्या जिल्हा स्तरीय योगासन स्पर्धामध्ये जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा गुळजचा तिसरी वर्गातील विद्यार्थी चि. संस्कार अण्णासाहेब पवार हा ८ ते १० वयोगटामध्ये प्रथम आला. त्याची पुणे येथे दिनांक १ व २ ऑगस्ट २०२६ रोजी होणाऱ्या ४५ व्या राज्य स्तरीय योग स्पर्धा साठी बीड जिल्ह्याच्या संघातून निवड झाली आहे.

बीड जिल्हा योग असोसिएशन यांच्या वतीने आज बीड जिल्हास्तरीय योगासन स्पर्धाचे आयोजन करण्यात आले होते. प्रत्येक गटातून पहिल्या तीन




क्रमांक मिळालेले खेळाडू राज्य स्तरीय योग स्पर्धा मधे बीड जिल्ह्याच्या संघातून सहभागी होणार आहेत.आज झालेल्या योगासन स्पर्धामध्ये चि . संस्कार अण्णासाहेब पवार ची राज्य स्तरीय योग स्पर्धा निवड झाल्याबद्दल बीड जिल्हा योग असोसिएशन यांच्या वतीने विकास गवते अध्यक्ष महाराष्ट्र योग असोसिएशन, विनायक वझे अध्यक्ष बीड जिल्हा योग असोसिएशन,इंजि. नितीन गोपन अध्यक्ष पतंजली योग समिती बीड, आंतरराष्ट्रीय योग खेळाडू श्रीमती राधा तांबे, राज्य पंच रामचंद्र ठोसर, राज्य पंच श्रीमती सारिका पवार यांच्या हस्ते मेडल व प्रमाणपत्र देण्यात आले

# बीड जिल्हा परिषदेच्या धोकादायक

## शाळा इमारतींचा तातडीने सर्व्हे करून विद्यार्थ्यांसाठी पर्यायी व्यवस्था करा -ए एस गोलू

बीड (प्रतिनिधी)

पावसाळा सुरू होऊनही बीड जिल्ह्यातील गाव-खेडे-वस्तीतील अनेक जिल्हा परिषद शाळा अद्याप दुरुस्त झालेल्या नाहीत. भिंतींना तडे, छत गळणे आणि इमारती कोसळण्याच्या स्थितीत असल्याने विद्यार्थ्यांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे.

या गंभीर बाबीकडे लक्ष वेधण्यासाठी शिवसेना अल्पसंख्याक जिल्हाप्रमुख मोहम्मद अझरुद्दीन ए.एस. गोलू यांनी दि. ६ जुलै २०२६ रोजी जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद बीड यांना निवेदन दिले.

निवेदनात ए एस गोलू म्हणाले की, गाव- खेड्यातील शाळा वर्षानुवर्षे दुरुस्तीच्या प्रतीक्षेत आहेत. पावसामुळे परिस्थिती आणखी बिकट झाली आहे. लहान मुले अशा धोकादायक इमारतींमध्ये शिकत आहेत.

तात्काळ दुरुस्ती करा,



जिल्ह्यातील ज्या जिल्हा परिषद शाळा दुरुस्त नाहीत अशा सर्व शाळांची तातडीने दुरुस्ती करण्यात यावी.किंवा पर्यायी व्यवस्था करा, दुरुस्ती होईपर्यंत त्या शाळेतील विद्यार्थ्यांसाठी टिनशेड, अतिरिक्त खोल्या किंवा जवळच्या सुरक्षित शाळेत तात्काळ पर्यायी व्यवस्था करण्यात यावी.

विद्यार्थ्यांच्या जीवनाशी निगडीत असलेल्या या विषयावर प्रशासनाने तातडीने लक्ष घालून योग्य ती कार्यवाही करावी अशी मागणी शिव सेना अल्पसंख्याक जिल्हा प्रमुख मोहम्मद अझरद्दीन ए एस गोलू यांनी केली आहे.

# संपादक बाबा शिंगोटे यांचे वृत्तपत्राच्या माध्यमातून समाजसेवेचे कार्य - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## लालबाग येथील चौक नामफलकाचे अनावरण

मुंबई (प्रतिनिधी)

स्वर्गीय मुरलीधर उपाख्य बाबा शिंगोटे सामान्य कुटुंबातून मेहनतीच्या जोरावर मोठा व्यवसाय उभारला. वृत्तपत्र विक्रीपासून ते अग्रणी वृत्तपत्र समूहाचे संस्थापक हा त्यांचा प्रवास थक्क करणार आहे बाबा शिंगोटे यांनी नेहमी वृत्तपत्राच्या माध्यमातून सामाजिक प्रश्न सोडवत समाजसेवेचे कार्य केल्याचे गौरवोद्गार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे काढले.

लालबाग येथील नारायण उद्योग भवन जवळील चौकाचे 'मुरलीधर उपाख्य बाबा शिंगोटे' असे नामकरण करण्यात आले. या नवीन चौक नामफलकाचे मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते अनावरण करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते.

कौशल्य विकास मंत्री मंगल प्रभात लोढा, महापौर रितू तावडे, पुण्यनगरी समूहाचे संचालक अरविंद शिंगोटे, प्रवीण शिंगोटे, भावेश शिंगोटे, प्रतीक शिंगोटे, राजकीय संपादक उदय तानपाठक, संपादक शैलेंद्र शिर्के आदी यावेळी उपस्थित




होते.मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, बाबा शिंगोटे यांनी वृत्तपत्र सृष्टीत मोठे विश्व निर्माण केले आहे. त्यांची दुसरी व तिसरी पिढी आपल्याला काम करताना या ठिकाणी पाहायला मिळत आहे. व्यवसाय कितीही मोठा झाला असला, तरी बाबा शिंगोटे नेहमी आपले साधेपणाला धरून राहिले. कधीही मोठेपणा दाखवला नाही. हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. या चौकाच्या नामकरणातून अशा प्रेरणादायी व्यक्तिमत्त्वाची नेहमी आठवण आपल्या मनात कायम राहील.



# स्व. डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या त्यागातूनच अखंड भारताची संकल्पना दृढ झाली - डॉ. प्रशांत पाटील

माजलगाव (प्रतिनिधी)

भारतीय जनसंघाचे संस्थापक, थोर राष्ट्रभक्त स्व. डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या जयंतीनिमित्त सिद्धीविनायक अर्बन शाखा माजलगावच्या कार्यालयात डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या प्रतिमेचे पूजन करून व पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी भाजप प्रदेश कार्यकारिणी सदस्य व सिद्धीविनायक अर्बनचे संस्थापक अध्यक्ष डॉ. प्रशांत पाटील यांनी डॉ. शामाप्रसाद मुखर्जी यांच्या जीवनकार्यावर आणि देशसेवेवर प्रकाश टाकून उपस्थितांशी संवाद साधला.याप्रसंगी प्रशांत भानप यांनी मनोगत व्यक्त केले.याप्रसंगी भाजपा माजलगाव उपाध्यक्ष मा. पंचायत समिती सदस्य अविनाश कांडुरे, भाजपा पात्रूड मंडळ उपाध्यक्ष हरिभाऊ नवले, भाजपा पदाधिकारी सतीश जोशी, गोपाळ कुलकर्णी दिगंबर वाघमोडे संतोष नांदुरकर शुभम वांजरखेडे उतरेश्वर खुर्पे सिद्धीविनायक अर्बनचे कर्मचारी, व सभासद उपस्थित होते.

# सेंद्रिय शेतीचा अवलंब केल्यास शरीर निरोगी राहण्यास मदत-प्राचार्य डॉ. श्रीराम आरसूळ

## ग्रामीण भागात कृषीविषयक मार्गदर्शनाचे उपक्रम सातत्याने राबवावेत-सरपंच पंडित कल्याण पोकळे

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री तथा हरितक्रांतीचे शिल्पकार वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त साजरा करण्यात येणारा महाराष्ट्र कृषी दिन चिंचाळा (ता. आष्टी) येथे उत्साहपूर्ण वातावरणात विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला. कृषी दिनाचे औचित्य साधून आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात सेंद्रिय शेती, आधुनिक कृषी तंत्रज्ञान, पर्यावरण संवर्धन आणि शेतकऱ्यांचे आरोग्य या विषयांवर सखोल मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमानंतर मान्यवरांच्या हस्ते जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या आवारात वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी चिंचाळा गावचे सरपंच पंडित कल्याण पोकळे होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. श्रीराम आरसूळ उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात हरितक्रांतीचे शिल्पकार वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेचे पूजन व अभिवादन करून करण्यात आली. उपस्थित मान्यवर, प्राध्यापक, शेतकरी, विद्यार्थी आणि ग्रामस्थांनी वसंतराव नाईक यांच्या कृषी क्षेत्रातील ऐतिहासिक योगदानाला आदरांजली वाहिली.

यावेळी मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ. श्रीराम आरसूळ यांनी बदलत्या ग्रामीण जीवनशैलीवर भाष्य केले. ते म्हणाले, पूर्वी ग्रामीण भागात सकाळी आणि संध्याकाळी गावातील शेतकरी एकत्र येऊन शेती, समाज आणि विकासासंबंधी विविध विषयांवर चर्चा करत असत. त्यामुळे गावात एकोपा, संवाद आणि परस्पर सहकार्याची भावना वृद्धिंगत होत असे. मात्र, आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात प्रत्यक्ष संवाद कमी होत असून त्याचा सामाजिक नातेसंबंधांवर परिणाम होत आहे.

शेतकऱ्यांनी आपल्या कुटुंबाच्या आरोग्याचा विचार करून सेंद्रिय शेतीचा अधिकाधिक अवलंब करावा. स्वतःच्या शेतात सेंद्रिय पद्धतीने फळे, भाजीपाला व अन्नधान्याचे उत्पादन घेऊन त्याचा वापर केल्यास शरीर निरोगी राहण्यास मोठी मदत होते. रासायनिक अवशेषांपासून मुक्त अन्न हे निरोगी जीवनाचा पाया असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

अध्यक्षीय भाषणात सरपंच पंडित कल्याण पोकळे यांनी कृषी महाविद्यालयाच्या उपक्रमांचे कौतुक करताना सांगितले की, ग्रामीण कृषी कार्यानुभव कार्यक्रमांतर्गत कृषिकन्यांनी




चिंचाळा गावात वास्तव्यास राहून शेतकऱ्यांना आधुनिक शेती तंत्रज्ञान, पीक व्यवस्थापन आणि विविध कृषी विषयांवर मार्गदर्शन केले. त्यामुळे गावातील शेतकऱ्यांना नवीन तंत्रज्ञानाची माहिती मिळून शेती अधिक सक्षम करण्यास मदत झाली आहे.

यापुढील काळातही कृषी महाविद्यालयाने चिंचाळा गावात कृषीविषयक प्रात्यक्षिके, प्रशिक्षण शिबिरे, मार्गदर्शन कार्यक्रम आणि शेतकरी मेळावे आयोजित करून शेतकऱ्यांना आधुनिक शेतीची माहिती द्यावी, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. तसेच उपस्थित सर्व शेतकरी, प्राध्यापक, विद्यार्थी व ग्रामस्थांचे आभार मानून कृषी दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमानंतर जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या परिसरात विविध वृक्षांची लागवड करण्यात आली. पर्यावरण संवर्धनासाठी प्रत्येकाने किमान एक तरी वृक्ष लावून त्याचे संगोपन करावे, असा संदेश यावेळी देण्यात आला.

या कार्यक्रमास राधाकिसन पोकळे, नवनाथ महाराज पोकळे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष भाऊसाहेब पोकळे, जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक दीपक मस्के, दादासाहेब चव्हाण, स्वाती खिलारे, बबन पोकळे (चेअरमन), देविदास पोकळे, कांतीलाल पोकळे, डॉ. जानदेव साळुंके, संतोष पोकळे, गहीनाथ पोकळे, मधुकर पोकळे, परसराम पोकळे, कृष्णा तांबे, कृष्णा पोकळे, पंढरीनाथ पोकळे, दिगंबर पोकळे, विजय पोकळे, गणेश काकासाहेब पोकळे, पोलीस पाटील तात्यासाहेब पोकळे, अनिल पोकळे, दीपक साळुंके, अमृत पोकळे, डॉ. अशोक पोकळे, गणेश पोकळे, संदीप पोकळे, प्रदीप पोकळे, बाळासाहेब पोकळे, बाबू भवर, पांडुरंग पोकळे, सागर पोकळे, लक्ष्मण पोकळे, अविनाश पोकळे, भाऊसाहेब रावसाहेब पोकळे, भाऊसाहेब गोरख पोकळे, कंकालेश्वर पोकळे, धनंजय पोकळे, अविनाश प्रभाकर पोकळे, महेश पोकळे, प्रतीक तोडकर, चंद्रकांत पोकळे यांच्यासह मोठ्या संख्येने शेतकरी, ग्रामस्थ आणि विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. लक्ष्मण मिसाळ यांनी केले. यावेळी कृषी महाविद्यालयाचे विषयतज्ज्ञ प्रा. सुजाता बनकर, प्रा. पोपट काळे, प्रा. सागरदेसाई पाटील, प्रा. गोकुळ नवसारे तसेच कार्यक्रमाधिकारी प्रा. रोहिणी शिंदे उपस्थित होत्या. या कार्यक्रमाचे नियोजन आणि आयोजन कृषिकन्या इनपा मनीषा, प्रांजल घुले, काजल रहाडे, वैष्णवी ससाने, पावनी थल्ला आणि संस्कृती थिटे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी त्यांनी विशेष परिश्रम घेतले.

कार्यक्रमाची सांगता जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करून करण्यात आली. यावेळी उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देत शिक्षणासोबतच पर्यावरण संवर्धन, वृक्षसंवर्धन आणि शेतीविषयक जागरूकता अंगीकारण्याचे आवाहन केले. कृषी दिनानिमित्त आयोजित या कार्यक्रमामुळे शेतकरी, विद्यार्थी आणि ग्रामस्थांमध्ये सेंद्रिय शेती, पर्यावरण संरक्षण आणि आधुनिक कृषी तंत्रज्ञानाबाबत जनजागृती होण्यास मोलाची मदत झाली.

# जिल्हा परिषद शाळेचा कायापालट करण्यासाठी सरसावले ग्रामस्थ

## पाथरवाला खुर्द येथील गावकऱ्यांनी उचलली शाळेच्या विकासाच्या जबाबदारी

घुंगर्डे हादगाव प्रतिनिधी :-

अंबड तालुक्यातील पाथरवाला खुर्द येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत पालक मेळावा उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. या मेळाव्यात विद्यार्थ्यांची प्रगती शाळेचे नियोजन आणि विविध सुविधा निर्माण करण्यासाठी गावकऱ्यांनी पुढाकार घेत आपापल्या परीने शाळेच्या विकासाची जबाबदारी उचलून आदर्श निर्माण केला आहे.

शासकीय निधी उपलब्ध नसलेल्या अत्यावश्यक कामांसाठी लोकसहभाग मिळवण्याचा निर्णय पालक व ग्रामस्थांनी घेतला. या निर्णयाला ग्रामस्थांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या मेळाव्यात विविध दात्यांनी शाळेच्या भौतिक सुविधांसाठी भरीव मदत जाहीर केली. यामध्ये ज्ञानेश्वर तावरे यांनी नवीन शाळेची घंटा तयार करून देण्याची तर गोकुळ घाडगे यांनी मोठा फोकस लाईट बसवून देण्याची जबाबदारी घेतली. शाळेच्या सुरक्षिततेसाठी सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यासाठी श्याम भैया हर्षे, आसाराम हर्षे, प्रल्हाद घाडगे, भोलेनाथ सुडके, मेहरनाथ हर्षे, ज्ञानेश्वर तावरे, प्रवीण हर्षे, सुरेश पाचुंदे, अमोल चव्हाण, कल्याण सुडके, राजेंद्र राऊत पोलीस पाटील आणि लक्ष्मण हर्षे यांनी प्रत्येकी १,००० रुपयांचे आर्थिक सहकार्य केले. यासोबतच रमेश नाना ढवळे



यांनी खुर्ची खरेदीसाठी १,००० रुपये देण्याचे जाहीर केले.

शाळेच्या शिक्षकांनी स्वतःच्या पुढाकारातून सुमारे ३५,००० रुपये किमतीचा संगणक आणि प्रिंटर संच खरेदी केला असून, उपस्थित ग्रामस्थांच्या हस्ते त्याचे उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष विलास हर्षे होते, त्यांनी शाळेसाठी ३,००१ रुपयांची मदत घोषित केली. तसेच उपाध्यक्ष सुभाष बेहडे व युवा उद्योजक किरण हर्षे यांनी ३,००० रुपयांचे आश्वासन देऊन सहकार्याचा शब्द दिला.

# जिल्हा परिषदेच्या शाळा मधून संस्कार व संस्कृती आजही जोपासली जाते-उद्योजक प्रवीण वारे

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) राज्यातील खाजगी शाळांच्या तुलनेमध्ये जिल्हा परिषद शाळा मधून विद्यार्थ्यांना चांगले संस्कार मिळतात आणि याच शाळांमधून भारतीय संस्कृतीचे जतन चांगल्या प्रकारे केले जाते. असे प्रतिपादन महाराष्ट्र आयकॉन्स पुरस्कार प्राप्त प्रवीण वारे यांनी बेलगाव येथे केले. आष्टी तालुका युवा पत्रकार संघाच्या वतीने अहिल्यानगर येथे नुकताच सदरचा मानाचा पुरस्कार प्रवीण वारे यांना मिळाला आहे. मराठवाडा भूषण आ.सुरेश धस, समाजसेविका डॉ. सुधाताई कांकरिया, अहिल्यानगर येथील इम्पल्स हॉस्पिटलचे सर्वेसर्वा डॉ. संदीप गाडे यांच्या शुभहस्ते सदरचा पुरस्कार अहिल्यानगर येथे युवा उद्योजक प्रवीण वारे यांना मिळाला आहे.

यावेळी बोलताना ज्येष्ठ पत्रकार ड. सीताराम पोकळे म्हणाले की, अत्यंत प्रतिकूल आणि बिकट परिस्थितीमध्ये प्रवीण वारे यांनी शून्यातून विश्व निर्माण केले आहे. आष्टी येथे स्वतःचे स्वतंत्र साम्राज्य उभे केले आहे. सामाजिक क्षेत्रामध्ये सुद्धा ते चांगले कार्य करीत आहेत. तोंडात साखर आणि डोक्यावर बर्फ ठेवून ते काम करतात. म्हणूनच त्यांना सदरचा पुरस्कार मिळाला आहे.

जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा बेलगाव केंद्र येथे केंद्रप्रमुख म्हणून प्रवीण मेहेरकर सर यांना पदोन्नती मिळाली आहे. त्याबद्दल त्यांचाही स्वागत समारंभ यावेळी आयोजित केला होता. यावेळी म्हसोबावस्ती येथील शिक्षक



वृंद श्रीमती टेकाडे मॅडम व अजय भराटे सर आणि पालकांनी त्यांचा यथोचित सत्कार केला.

यावेळी सत्काराला उत्तर देताना ते म्हणाले की, पालकांनी आपली मुले जिल्हा परिषद शाळेमध्ये पाठवावेत. इयत्ता सातवी पर्यंतच्या वर्गामध्ये शिक्षणाची सोय शासनाने आपापल्या गावी केलेली आहे. त्यासाठी पालकांना कसलाही खर्च येत नाही. याउलट खाजगी शाळांमध्ये मुले पाठवले तर दरवर्षी ५० ते ६० हजार रुपये खर्च प्रत्येक विद्यार्थ्यामागे येतो. हे पैसे वाचवून पालकांनी त्याचा उपयोग पुढील शिक्षणासाठी करावा. असे आवाहनही यावेळी प्रवीण मेहेरकर सर यांनी केले.

पुढे बोलताना ते म्हणाले की, बेलगाव येथे तीन शाळा आहेत. अंबिका नगर वस्ती शाळा येथे मुलांची पटसंख्या पूर्ण आहे. म्हसोबावस्ती शाळा येथील मुलांची पटसंख्या सुद्धा वाढू लागली आहे. गावातील शाळेची विद्यार्थी पटसंख्या वाढवण्यासाठी आम्ही शिक्षक वृंद सर्वतोपरी प्रयत्न करणार आहोत. गावातील पालकांनी व नागरिकांनी आम्हाला सहकार्य करावे असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

यावेळी बेलगावचे उपसरपंच ज्ञानेश्वर माऊली पोकळे तसेच म्हसोबावस्ती येथील सर्व शिवश्री दत्ता मारुती पोकळे, सुधीर दिनकर पोकळे, भाऊसाहेब पांडुरंग पोकळे, तानाजी सुभाष पोकळे, दीपक सिताराम पोकळे, दत्ता महादेव पोकळे, बाबासाहेब मच्छिंद्र पोकळे, माजी उपसरपंच सतीश नवनाथ पोकळे, ग्रामपंचायत सदस्य महादेव मारुती महादेव सरोदे, माजी सरपंच जयसिंग मुकिंदा पोकळे, ग्रामपंचायत सदस्य शिवाजी रमेश पोकळे महेश फुलचंद पोकळे, हनुमंत मुकिंदा पोकळे अक्षय दत्ता पोकळे, अशोक दशरथ पोकळे, नारायण रामभाऊ पोकळे चेअरमन ,जालिंदर मुकिंदा पोकळे ,बाळासाहेब रामभाऊ घाडगे, सतीश रामकिसन पोकळे आदी मान्यवर पालक उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जेष्ठ नागरिक आदरणीय कारभारी भाऊ मोकिंदा पोकळे हे होते. शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष निखिल फुलचंद पोकळे यांनी प्रास्ताविक पर भाषण केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन शाळेचे शिक्षक अजय भराटे सर यांनी केले.

# अपघातग्रस्त शिवाजी पठाडे यांना मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीतून ६० हजारांची मदत

## वेळेवर धावून आले लोकनेते आ.सुरेश धस

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) आष्टी-पाटोदा-शिरूर विधानसभा मतदारसंघातील सर्वसामान्य नागरिकांच्या अडचणीच्या काळात मदतीचा हात पुढे करणारे लोकनेते आ. सुरेश धस यांनी पुन्हा एकदा सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडविले आहे.

गांधनवाडी (ता. आष्टी) येथील अपघातग्रस्त शिवाजी श्रीराम पठाडे यांच्या उपचारासाठी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीतून तब्बल ६० हजार रुपयांची आर्थिक मदत मंजूर करून देण्यात आल्याने पठाडे कुटुंबाला मोठा आर्थिक दिलासा मिळाला आहे.

शिवाजी श्रीराम पठाडे यांचा काही दिवसांपूर्वी गंभीर अपघात झाला होता. या अपघातात त्यांना गंभीर दुखापत झाल्याने तातडीने उच्चस्तरीय वैद्यकीय उपचारांची गरज निर्माण झाली. ही बाब समजताच आष्टा गटाचे जिल्हा परिषद सदस्य अमरराजे निंबाळकर आणि शहाजी झांबरे यांनी त्वरित आ. सुरेश धस यांच्याशी संपर्क साधून संपूर्ण परिस्थितीची माहिती दिली.

घटनेचे गांभीर्य लक्षात घेत आ. सुरेश धस यांनी कोणताही विलंब न करता रुग्णाला अहिल्यानगर येथील साई एशियन हॉस्पिटलमध्ये दाखल करून सर्वोत्तम उपचार सुरू करण्याच्या सूचना दिल्या. त्यानुसार शिवाजी पठाडे यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले.

दरम्यान, शस्त्रक्रिया व पुढील उपचारांसाठी मोठ्या आर्थिक खर्चाची आवश्यकता असल्याने आमदार धस यांनी त्यांच्या कार्यालयातील आरोग्य विभागाचे कामकाज पाहणारे समन्वयक विकास साळवे यांना मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीतून मदत मिळवून देण्यासाठी तातडीने आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. त्यानुसार आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून प्रस्ताव सादर करण्यात आला.

या पाठपुराव्याला यश मिळत मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीतून ६० हजार रुपयांची आर्थिक मदत मंजूर करण्यात आली. मंजूर झालेली रक्कम थेट अहिल्यानगर येथील साई एशियन हॉस्पिटलच्या खात्यात जमा करण्यात आली. त्यामुळे उपचाराचा आर्थिक भार मोठ्या प्रमाणात कमी झाला. रुग्णावर यशस्वी शस्त्रक्रिया पार पडली असून सध्या शिवाजी पठाडे यांची प्रकृती सुधारत असल्याची माहिती कुटुंबीयांनी दिली. योग्य वेळी उपचार आणि आर्थिक मदत मिळाल्यामुळे मोठा दिलासा मिळाल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

यावेळी पठाडे कुटुंबीयांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महायुती सरकार, आमदार सुरेश धस तसेच मुख्यमंत्री



वैद्यकीय सहाय्यता निधीच्या प्रक्रियेसाठी सातत्याने पाठपुरावा करणारे आरोग्य विभागाचे समन्वयक विकास साळवे यांचे मनःपूर्वक आभार मानले.

तसेच उपचारादरम्यान साई एशियन हॉस्पिटलचे संचालक डॉ. सचिन पाडुळे आणि डॉ. अभय पाटील यांनी दिलेल्या मोलाच्या सहकार्याबद्दलही कुटुंबीयांनी कृतज्ञता व्यक्त केली.

सर्वसामान्य नागरिकांना अडचणीच्या काळात तातडीची मदत मिळावी, यासाठी आमदार सुरेश धस सातत्याने प्रयत्नशील असून मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीच्या माध्यमातून अनेक गरजू रुग्णांना आर्थिक आधार मिळवून देण्यात त्यांचा पुढाकार राहिला आहे. शिवाजी पठाडे यांच्या प्रकरणातही वेळेवर झालेल्या हस्तक्षेपामुळे एका गरजू कुटुंबाला मोठा आधार मिळाल्याची भावना परिसरातील नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

# अखिल भारतीय कबड्डी पंच परीक्षेत राजाभाऊ थोरात यांची घवघवीत बाजी

राष्ट्रीय पंचपदी निवड, शिवसेनेकडून जंगी सत्कार

बदनापूर प्रतिनिधी : बदनापूर तालुक्यातील अकोला येथील क्रीडाप्रेमींसाठी अभिमानाची बातमी समोर आली असून, कबड्डी क्षेत्रात अनेक वर्षांपासून उल्लेखनीय कार्य करणारे राजाभाऊ थोरात यांनी अखिल भारतीय कबड्डी पंच परीक्षेत दैदिप्यमान यश संपादन करत राष्ट्रीय पंच म्हणून मानाची निवड मिळवली आहे. त्यांच्या या यशामुळे बदनापूर तालुक्याच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

उत्कृष्ट कबड्डीपटू, अभ्यासू मार्गदर्शक आणि निष्पक्ष पंच अशी ओळख निर्माण केलेल्या राजाभाऊ थोरात यांनी गेल्या अनेक वर्षांपासून जालना जिल्ह्यासह विविध भागांतील कबड्डी स्पर्धांमध्ये अत्यंत जबाबदारीने पंच म्हणून काम पाहिले आहे. त्यांच्या अचूक निर्णयक्षमतेमुळे आणि खेळाप्रती असलेल्या समर्पणामुळे त्यांनी कबड्डी विश्वात वेगळी छाप निर्माण केली आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक होतकरू खेळाडूंनी राज्य व राष्ट्रीय स्तरावर यश मिळवले आहे.




या ऐतिहासिक यशाबद्दल बदनापूर येथील शिवसेना जनसंपर्क कार्यालयात शिवसेना जिल्हाप्रमुख मा. भाऊसाहेब घुगे यांच्या हस्ते राजाभाऊ थोरात यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन जंगी सत्कार करण्यात आला.

यावेळी उपतालुकाप्रमुख महादू गीते, विधानसभा संघटक कैलास दुधानी, विभागप्रमुख रामेश्वर पाटील नागवे, रामेश्वर पाटील दराडे, विजयभाऊ कठाळे, गणपतराव केकान, अन्सारभाई पठाण, योगेश वीर, विलास तुपे, कैलास वैद्य तसेच शिवसेनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि क्रीडाप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

राजाभाऊ थोरात यांच्या राष्ट्रीय पंचपदी झालेल्या निवडीचे सर्व स्तरातून जोरदार स्वागत होत असून, क्रीडा क्षेत्रातील मान्यवर, खेळाडू, प्रशिक्षक आणि नागरिकांकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. त्यांच्या या यशामुळे बदनापूर तालुक्यातील युवा खेळाडूंना नवी प्रेरणा मिळाली असून, कबड्डी क्षेत्रात अधिक जोमाने कार्य करण्याची ऊर्जा निर्माण झाली आहे.

# महाराष्ट्रात वसुंधरा प्राथमिक विद्यालयाचा दैदिप्यमान ठसा

## शिष्यवृत्ती परीक्षेत १५९ विद्यार्थी पात्र,तब्बल ४ कोटी ६८ लाखांच्या शिष्यवृत्तीचे मानकरी

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) आष्टी तालुक्यातील वसुंधरा प्राथमिक विद्यालयाने यंदाच्या पूर्व उच्च प्राथमिक (इयत्ता पाचवी) व पूर्व माध्यमिक (इयत्ता आठवी) शिष्यवृत्ती परीक्षेत अभूतपूर्व यश संपादन करत महाराष्ट्राच्या शैक्षणिक क्षेत्रात आपल्या गुणवत्तेचा ठसा उमटवला आहे. विद्यालयातील तब्बल १५९ विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक ठरले असून त्यांना एकूण सुमारे ४ कोटी ६८ लाख रुपयांची शिष्यवृत्ती मिळणार आहे. तसेच राज्य गुणवत्ता यादीत मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांनी स्थान मिळविल्याने विद्यालयाच्या यशात आणखी भर पडली आहे.

पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इयत्ता पाचवी) मध्ये विद्यालयातील १०० विद्यार्थी परीक्षेला बसले होते आणि विशेष म्हणजे सर्वच्या सर्व १०० विद्यार्थी पात्र ठरून विद्यालयाने शंभर टक्के निकालाची नोंद केली. त्यापैकी ९२ विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक ठरले असून २४ विद्यार्थ्यांनी राज्य गुणवत्ता यादीत स्थान मिळवले आहे. राज्यात साईदीप सचिन काळे याने पाचवा, अर्षती राहुल आरेकर हिने सातवा, प्रांजल जालिंदर पोकळे व शिवराज शाहाजी शिंदे यांनी आठवा, तर ज्ञानेश्वरी नितीन पोठरे, शिवम ज्ञानदेव खाडे, श्रेया शिवाजी घोडके, स्वरूप संदीप बेळेकर आणि उत्कर्षा युवराज पारखे यांनी नववा क्रमांक मिळवत राज्यस्तरावर विद्यालयाचा गौरव वाढविला. या विद्यार्थ्यांना आकाश कांबळे, सारिका शिंदे आणि स्नेहल गांगर्डे यांनी सातत्यपूर्ण मार्गदर्शन केले.

पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इयत्ता आठवी) मध्येही विद्यालयाने आपल्या गुणवत्तेची परंपरा कायम राखत ६७ विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक घडविले. त्यापैकी १२ विद्यार्थ्यांनी राज्य गुणवत्ता यादीत स्थान मिळवले. श्रावणी शंकराव गदादे हिने राज्यात तिसरा क्रमांक, श्रेयशी युवराज भोसले हिने सहावा क्रमांक, तर आदेश आदिनाथ दळवी, अदिती अजय भराटे, संस्कृती गणेश शेळके, अनुज दत्तात्रय कुलकर्णी, जानवी दत्तात्रय गबले, श्रेयश सोमनाथ बनकर, आराध्या राजकुमार पोकळे, आर्या अभयकुमार पवार आणि सय्यद रीजा इकबाल यांनीही राज्य गुणवत्ता यादीत स्थान मिळवत विद्यालयाचे नाव उंचावले.

इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांच्या यशामागे वैशाली चव्हाण, वर्षा कसरे, गणेश हिंगणे, सचिन ढाकणे, मंगेश भालेराव, दादासाहेब लांडगे, सचिन काळे, प्रीती उदमले, गजेंद्र धारक आणि संध्या साप्ते यांचे प्रभावी मार्गदर्शन लाभले. तसेच मीनाक्षी तांबारे, अर्चना परदेशी, गणेश ननवरे, महादेव कदम, अक्षय गव्हाणे, हनुमंत पाद्रे आणि अर्जुन देवकाते यांनीही विद्यार्थ्यांच्या तयारीसाठी विशेष सहकार्य केले.




विद्यालयाने सातत्याने गुणवत्तापूर्ण शिक्षणावर भर देत विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती परीक्षेची नियोजनबद्ध तयारी करून घेतली. विद्यार्थ्यांची जिद्द, शिक्षकांचे अथक परिश्रम, नियमित सराव, अभ्यासाचे काटेकोर नियोजन आणि पालकांचे मोलाचे सहकार्य यामुळेच हे यश शक्य झाल्याची भावना विद्यालयाच्या वतीने व्यक्त करण्यात आली. प्रत्येक विद्यार्थ्याच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात येणारे उपक्रम, वैयक्तिक मार्गदर्शन आणि गुणवत्तेला दिलेले प्राधान्य यामुळे वसुंधरा प्राथमिक विद्यालयाने राज्यात स्वतःचे वेगळे स्थान निर्माण केले आहे.

# शेतकऱ्यांना नापिकी आणि कर्ज या दुष्टचक्रातून बाहेर काढण्यासाठी महत्वपूर्ण योजना

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजना २०२६




छत्रपती संभाजीनगर / बीड

राज्यातील शेतक-यांना निसर्गाचा लहरीपणा सांभाळत शेती करावी लागते आणि त्या शेतीसाठी मेहनत घेऊनही अनेकदा अतिवृष्टी दुष्काळ यामुळे पिकांचे नुकसान होत असते. पीक आले नाही तर उत्पन्न नाही आणि परिणामी शेतीसाठी बँकेकडून घेतलेले कर्ज फेडणे शक्य होत नाही. या मुळे शेतकरी वर्ग सतत चिंतेत असतो. शेतकरी वर्गास नापिकी आणि कर्ज थकणे या दुष्टचक्रात अडकून पडावे लागते.

शेतकरी वर्गास प्राधान्य देणाऱ्या सरकारने यासाठीच पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमाफी योजना २०२६ ही जाहिर केली आहे. या रूपाने ही आजवरची सर्वात मोठी आणि राज्यातील ५८ लाखांहून अधिक शेतकऱ्यांना लाभ देणारी महाकर्जमुक्ती ठरली आहे.

शेतकरी बांधवांना २ लाख रुपयांपर्यंत असणारे कर्ज माफ होणार आहे. ज्यांचे कर्ज २ लाखांपेक्षा अधिक आहे अशा शेतकऱ्यांनी २ लाख रुपयांपेक्षा जादा असलेला थकीत कर्जाची रक्कम भरल्यानंतर त्यांनाही याचा लाभ मिळणार आहे. आणि जे शेतकरी कर्ज घेऊन त्याची नियमित परतफेड करतात अशा शेतकऱ्यांचाही विचार या योजनेत झाला आहे. नियमित कर्जाचे हप्ते भरणाऱ्या शेतकऱ्यांनाही प्रोत्साहन म्हणून ५० हजार रुपये प्रोत्साहनपर रक्कम या कर्जमुक्ती मोहिमेत दिली जाणार आहे.

शासन स्तरावर शेतकरी वर्गास प्राधान्य देण्याची जी भूमिका आहे त्याचाच एक भाग म्हणून याकडे आपणास बघता येईल. शेतकऱ्यांनी पीक कर्ज घेतानाच पिकाचा विमा घेण्याचा सल्ला दिला जातो आणि त्यांच्या पिकाचा विमा देखील काढला जातो. ही योजना प्रधानमंत्री फसल विमा म्हणून सर्वांना परिचित आहे. या अंतर्गत वेळोवेळी पिकाचे नुकसान आलेल्या शेतकऱ्यांना विमा कंपन्यांनी भरपाई दिलेली आहे.

बीड जिल्हा हा मुख्यत्वे शेतीवर आणि अनुषंगिक व्यवसायांवर आधारित आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६ अंतर्गत शेतकऱ्यांना २ लाखांची कर्ज माफ योजना लाभाचीच ठरणार आहे. मात्र यापूर्वीही शासनाने आपली लक्ष्यात घेऊन वेळोवेळी शेतकऱ्यांना नैसर्गिक आपत्ती शेतीपीक अनुदान वाटप केलेले आहे. याचाही नोंद यावेळी घेतली पाहिजे.

जिल्ह्यात २०२५-२६ च्या खरिप हंगामात अवकाळी पाऊस आणि अतिवृष्टी या दोन्हीमुळे जिल्ह्यात शेतीपिकाचे नुकसान झाले होते. त्यासाठी शासनाने बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना १४५८ कोटी रुपयांहून अधिक रक्कम देऊ केली सोबतच याचवर्षी रब्बी हंगामात पेरणीसाठी अनुदान म्हणून ६५० कोटी रुपये अनुदान दिले. सोबतच पिक विमा भरपाई वेगळी आहे आणि त्यानंतर आता या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी २०२६ याअंतर्गत प्रत्येक शेतकऱ्यास २ लाख रुपये कर्जमाफी देखील दिली आहे.

शेतकरी हा मुख्य घटक मानुन शेतकरी हित केंद्रीत या सर्व भूमिकेमुळे शासन शेतकऱ्याला नापिकी आणि कर्ज या दुष्टचक्रातून मुक्त करण्यास कटिबद्ध आहे याचीच खात्री शेतकऱ्यांना दिली आहे.

शब्दांकन
प्रशांत दैठणकर
प्र. उपसंचालक तथा
जिल्हा माहिती अधिकारी, बीड.
९८२३१९९४६६



# भाटसांगवी मारहाण प्रकरणातील आरोपींना तात्काळ अटक करा

## चर्मकार महासंघाचे पोलिस अधीक्षक यांना निवेदन

तलवाडा (प्रतिनिधी)

भाटसांगवी (ता. बीड) येथे घडलेल्या मारहाण प्रकरणातील आरोपींना तात्काळ अटक करून फिर्यादीला पोलीस संरक्षण द्यावे, अशी मागणी चर्मकार महासंघ, बीड जिल्ह्याच्या वतीने जिल्हा पोलीस अधीक्षकांकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

निवेदनानुसार, औरंगापूर येथील गोवर्धन हरिभाऊ पवार यांच्यासह काही नागरिक २३ मार्च २०२६ रोजी भाट सांगवी येथे एका धार्मिक कार्यक्रमानिमित्त गेले होते. कार्यक्रमानंतर बाहेर आल्यानंतर काही व्यक्ती एका चारचाकी वाहनाची तोडफोड करत असल्याचे दिसले. याबाबत विचारणा केल्यानंतर वाद निर्माण झाला. त्यानंतर काही जणांनी धारदार शस्त्रे व काठ्यांनी हल्ला केल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. या घटनेत गोवर्धन पवार व त्यांच्यासोबत असलेले काही जण जखमी झाल्याचे नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणी पिंपळनेर पोलीस ठाण्यात अनुसूचित जाती-जमाती (अत्याचार प्रतिबंधक) कायद्यासह भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मात्र, गुन्हा दाखल होऊन तीन महिन्यांहून अधिक कालावधी उलटूनही प्रमुख आरोपींना अटक करण्यात आलेली नसल्याचा आरोप महासंघाने केला आहे. फिर्यादीला आरोपींकडून जीवितास धोका असल्याने तातडीने पोलीस संरक्षण द्यावे तसेच सर्व आरोपींना तत्काळ अटक करून कार्यवाही करण्यात यावी अशी मागणीही यावेळी करण्यात आली आहे.

दरम्यान, आरोपींवर तातडीने कारवाई न झाल्यास राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या वतीने राज्यभर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा जिल्हाध्यक्ष नानासाहेब घोडके, ड शिवाजी कांबळे, सोनवणे, गवळी यांच्यासह संघटनेच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या वतीने देण्यात आला आहे.



# महर्षी धोंडो केशव कर्वे यांनी महिला उच्च शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली – प्राचार्य डॉ. नामदेव सानप

छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)

महिलांच्या उच्च शैक्षणिक उत्कर्षासाठी स्वातंत्र्यपूर्व कालखंडात उच्च शिक्षणाचे महत्त्व ओळखून महर्षी धोंडो केशव कर्वे यांनी महिला उच्च शिक्षणासाठी श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठाची स्थापना केली. असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. नामदेव सानप यांनी व्यक्त केले.

छत्रपती संभाजीनगर येथे तुलसी महिला मंडळ संचलित सावित्रीमाई महिला महाविद्यालयात नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठाचा १११ वा वर्धापन दिन महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाद्वारे साजरा करण्यात आला. याप्रसंगी प्राचार्य डॉ. नामदेव सानप हे बोलत होते. यावेळी व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून संस्थेची व्यवस्थापकीय प्रशासक प्रा. संतोष प्रधान यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी महर्षी धोंडो केशव कर्वे यांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात आले. यावेळी कार्यक्रम अधिकारी प्रा. सौ. ज्योती मोरे यांनी प्रस्तावित केले. शेवटी प्रा.हर्षद वाघमारे यांनी आभार मानले. यावेळी प्रा. डॉ. प्रज्ञा किवंडे. प्रा. डॉ. अस्मिता साळवे प्रा. उत्कर्ष इंगोले प्रा. प्रियंका रामटेके, प्रा.तुबा सय्यद यांच्यासह बहुसंख्य विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

# 'संविधान वाचवा - लोकशाही वाचवा'च्या घोषणांनी जिल्हाधिकारी कार्यालय दणाणले

## लोकशाही मार्गाने आंदोलन करणाऱ्यांवरील जिल्हा हद्दपारीच्या कारवाईचा निषेध – डॉ. गणेश ढवळे




बीड (प्रतिनिधी)

केंद्र व राज्य सरकारच्या निर्णयां विरोधात लोकशाही मार्गाने आंदोलन करणाऱ्या नागरिकांवर करण्यात येत असलेल्या कथित दडपशाहीच्या निषेधार्थ तसेच संविधानाने नागरिकांना प्रदान केलेल्या मूलभूत अधिकारांचे संरक्षण करण्याच्या मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते तथा बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ, महाराष्ट्र राज्यचे मुख्य प्रचार प्रमुख डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांच्या नेतृत्वाखाली दि.६ सोमवारी रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने करण्यात आली.यावेळी आंदोलकांनी 'संविधान वाचवा - लोकशाही वाचवा', ' हुकुमशाही चालणार नाही चालणार', 'केंद्र सरकार मुर्दाबाद', 'भाजपा सरकार मुर्दाबाद' अशा घोषणा देत सरकारच्या धोरणांचा निषेध व्यक्त केला. त्यानंतर जिल्हाधिकारी, बीड यांच्या मार्फत राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु, पंतप्रधान नरेंद्रजी मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह,राज्यपाल जिष्णू देव वर्मा, मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे, उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री बीड सुनेत्रा पवार आणि महाराष्ट्र राज्याचे पोलीस महासंचालक यांना निवेदन पाठविण्यात आले.केंद्र सरकारच्या धोरणांविरोधात घोषणाबाजी आणि आंदोलन केल्याप्रकरणी सोशलिस्ट डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडियाचे सरचिटणीस सय्यद अहमद अब्दुल वाहिद चौधरी यांच्यावर करण्यात आलेल्या जिल्हा हद्दपारीच्या कारवाईमुळे भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद १९ व २१ अंतर्गत नागरिकांना मिळालेल्या अभिव्यक्ती स्वातंत्र्य, शांततापूर्ण आंदोलनाचा अधिकार आणि सन्मानाने जगण्याच्या अधिकाराचे उल्लंघन झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. संबंधित प्रकरणात जबाबदार अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणीही निवेदनातून करण्यात आली.

या आंदोलनात शेख युनुस, रामनाथ खोड, माजी सैनिक अशोक येडे( बीड जिल्हाध्यक्ष आम आदमी पार्टी),बाळासाहेब मोरे पाटील( प्रदेशाध्यक्ष शिवशक्ती भिमशक्ति विचारमंच), सय्यद सादेक, , प्राचार्य डी. जी. तांदळे (मार्गदर्शक, मराठवाडा शिक्षक संघ), बाजीराव ढाकण, डॉ .संजय तांदळे,नितीन सोनावणे(राज्य प्रवक्ता तथथा बीड जिल्हाध्यक्ष ऑल इंडिया पँथर सेना), हनुमंत घोडके , दत्तात्रय सुरवसे आदी सहभागी झाले.

# जिल्हाभरात लोकप्रतिनिधीचा राजीनामा मागणारी बॅनर कशासाठी ?




माजलगाव (प्रतिनिधी)

पीकविमा, सरसकट कर्जमाफी, घोषित शेतकरी अनुदान तसेच इतर प्रलंबित शेतीविषयक प्रश्नांवर लोकप्रतिनिधींनी सभागृहात प्रभावीपणे आवाज उठवावा, अशी मागणी करत अखिल भारतीय किसान सभेच्या वतीने बीड जिल्ह्यात विविध ठिकाणी फलक लावून मागणी करण्यात आली.

संघटनेने लावलेल्या फलकांवर, सरसकट कर्जमाफी, २०२५ चा पीकविमा, घोषित शेतकरी अनुदान व इतर शेती प्रश्नांवर सभागृहात प्रश्न मांडणार नसाल तर राजीनामा द्या,असा मजकूर प्रसिद्ध करण्यात आला आहे. या माध्यमातून जिल्ह्यातील आमदार, खासदार लोकप्रतिनिधींनी शेतकऱ्यांच्या प्रश्नांबाबत ठोस भूमिका घ्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

जिल्ह्यातील विविध शहरात प्रमुख चौक, बाजारपेठा आणि सार्वजनिक ठिकाणी हे फलक झळकविण्यात आले असून, या मोहिमेमुळे नागरिक आणि शेतकऱ्यांमध्ये चर्चेला उधाण आले आहे.

# ओळखीपलीकडे शिक्षणाचा हक्क..!

## तृतीयपंथीय विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना 'स्माईल'ची नवी उभारी..!!




बीड (प्रतिनिधी)

समाजाच्या मुख्य प्रवाहापासून अनेक वर्षे वंचित राहिलेल्या तृतीयपंथीय विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या माध्यमातून सन्मानाने जगण्याची संधी मिळावी, या उद्देशाने केंद्र सरकारच्या सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालयाने 'स्माईल ' शिष्यवृत्ती योजना सुरू केली आहे. या योजनेअंतर्गत पात्र तृतीयपंथीय विद्यार्थ्यांना दरवर्षी १३,५०० रुपयांची शिष्यवृत्ती देण्यात येणार असून, ऑनलाइन अर्ज प्रक्रिया सुरू झाली आहे.

या योजनेचा लाभ इयत्ता ९ वी व १० वीतील प्री-मॅट्रिक, इयत्ता ११ वी, १२ वी, महाविद्यालयीन तसेच पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या तृतीयपंथीय विद्यार्थ्यांना मिळणार आहे. शासनमान्य अथवा खासगी शाळा, महाविद्यालय किंवा विद्यापीठात नियमित शिक्षण घेणारे भारतीय नागरिक या योजनेसाठी पात्र असतील. मात्र, सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालयाकडून जारी करण्यात आलेले अधिकृत ट्रान्सजेंडर आयडेंटिटी सर्टिफिकेट असणे बंधनकारक आहे.

इच्छुक विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय पोर्टलवर नोंदणी करून ऑनलाइन अर्ज करावा. शिष्यवृत्तीच्या जागा मर्यादित असल्याने लाभार्थ्यांची निवड मागील शैक्षणिक वर्षातील गुणवत्तेनुसार केली जाणार आहे. तसेच केंद्र किंवा राज्य शासनाच्या अन्य कोणत्याही शिष्यवृत्तीचा लाभ घेणारे विद्यार्थी या योजनेसाठी पात्र राहणार नाहीत. शिष्यवृत्तीची रक्कम थेट डीबीटी प्रणालीद्वारे विद्यार्थ्यांच्या आधार-लिंक बँक खात्यात जमा केली जाईल.

ही योजना केवळ आर्थिक मदत नसून, तृतीयपंथीय विद्यार्थ्यांना शिक्षण, समान संधी आणि सन्मानाने भविष्य घडविण्याचा नवा विश्वास देणारे महत्त्वाचे पाऊल असल्याची भावना विविध सामाजिक संघटनांकडून व्यक्त होत आहे.

**पत्रकार शेख आयेशा यांच्या न्याय मागणीला अखेर सरकारकडून संवेदनशील साथ..**

दरम्यान, महाराष्ट्रात तृतीयपंथीय विद्यार्थ्यांसाठी अशा स्वरूपाच्या शैक्षणिक सहाय्याची गरज असल्याचे सातत्याने मांडणाऱ्या 'आश्रय सेवाभावी केंद्राच्या' अध्यक्षा तथा पत्रकार शेख आयेशा यांनी या विषयावर अनेकदा शासनाकडे पाठपुरावा केला होता. त्यांच्या सातत्यपूर्ण मागणीमुळे तृतीयपंथीय विद्यार्थ्यांच्या शिक्षणाविषयी शासनाची संवेदनशील भूमिका अधिक ठळकपणे समोर आल्याचे मानले जात आहे.

# शिक्षण हाच परिवर्तनाचा श्वास

## पिपल्स एज्युकेशन सोसायटीचा ६१ वा वर्धापन दिन उत्साहात साजरा होणार

बीड । प्रतिनिधी

महामानव अभिवादन ग्रुप व 'वाचाल तर वाचाल' फिरते मोफत वाचनालय यांच्या संयुक्त विद्यमाने पिपल्स एज्युकेशन सोसायटीचा ६१ वा वर्धापन दिन बुधवार, दि. ८ जुलै २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजता बीड येथील तुलसी संगणक व माहितीशास्त्र महाविद्यालयाच्या सभागृहात उत्साहात साजरा करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमात शिक्षण, समाजकारण, पत्रकारिता आणि विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा सत्कार करण्यात येणार असून माजी विद्यार्थ्यांचाही गौरव केला जाणार आहे.

शिक्षण हेच परिवर्तनाचे शस्त्र या विचाराला केंद्रस्थानी ठेवून आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात समाजातील विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय योगदान देणाऱ्या व्यक्तिमत्त्वांचा गौरव करण्यात येणार आहे. विशेष म्हणजे, शिक्षण क्षेत्रात कार्यरत असलेल्या प्रा. प्रदीप रोंडे तसेच ज्येष्ठ पत्रकार आयु. उत्तम हजारे यांचा विशेष सत्कार हा कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण ठरणार आहे.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. उत्तमराव साळवे (स्वातंत्र्यवीर सावरकर महाविद्यालय, बीड) हे राहणार आहेत.यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून आयु. पी. टी. बनसोडे (सेवानिवृत्त अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी), सुभाष साळवे (जिल्हा कृषी अधीक्षक, बीड), वैभव स्वामी (संपादक, दैनिक समर्थ राजयोग तसेच प्रदेशसंपर्क प्रमुख पत्रकार संघ महाराष्ट्र राज्य), मा.मिलिंद तुपसमुद्रे (प्र. माहिती अधिकारी, बीड), प्राचार्य डी. जी. निकाळजे (तुलसी संगणक व माहितीशास्त्र महाविद्यालय, बीड) आणि आर. जी. एम. भोळे (अध्यक्ष, महामानव अभिवादन ग्रुप, बीड) यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

कार्यक्रमात पिपल्स एज्युकेशन सोसायटीच्या माजी विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात येणार असून, समाजातील शैक्षणिक, सामाजिक आणि वैचारिक कार्याला चालना देणाऱ्या उपक्रमांचा आढावा देखील यावेळी घेण्यात येणार आहे. विविध क्षेत्रांतील मान्यवर, शिक्षक, विद्यार्थी, सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिकांनी या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग अँण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED- 431122 ( MAHARSHTRA ).